# प्रेसनोट

दिनांक- २७/१२/२०१८.

## कर्जत येथील तलाठयास लाच स्विकारताना अटक

दिनांक २६/१२/२०१८ रोजी, कर्जत येथील तलाठी श्रीराम मनोहर हंगे, वय ५४ वर्षे यांना यातील तक्रारदार यांच्याकडून ५,०००/- रुपयांची लाच स्विकारताना रंगेहात पकडण्यात आले असुन, त्याबाबत थोडक्यात हकिकत खालीलप्रमाणे.

यातील तक्रारदार यांनी खरेदी केलेल्या जमिनीची नोंद करण्यासाठी वरील नमुद लोकसेवक यांनी तक्रारदार यांच्याकडे ५,०००/- रुपयांची मागणी केली होती. सदरबाबत तक्रारदार यांनी ॲन्टी करप्शन ब्युरो, ठाणे यांचेकडे तक्रार नोंदविली होती.

तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने पडताळणी केली असता, वरील नमुद लोकसेवक यांनी तक्रारदार यांच्याकडे लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाल्यावरुन अेसीबी, ठाणे युनिट यांनी सापळयाचे आयोजन करुन **लोकसेवक** श्रीराम मनोहर हंगे यांना तक्रारदार यांच्याकडून ५,०००/-(पाच हजार) रुपयांची लाच स्विकारताना रंगेहात पकडण्यात आले. गुन्हयाचा पुढील तपास श्री.बाळकृष्ण सावंत, पोलीस उप अधीक्षक अेसीबी, ठाणे हे करीत असुन त्यांचा संपर्क क्रमांक ९९२३१०२१८१ असा आहे.

**शासकीय लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत ॲन्टी करप्शन ब्युरो, ठाणे कार्यालयास खालील दुरध्वनी क्रमांकावर संपर्क करावा.**

---

१) टोल फ्री क्र. :- १०६४
२) दुरध्वनी क्रमांक :- ०२२-२५४२७९७९
३) ई-मेल आयडी :- **spacbthane@mahapolice.gov.in**
४) वेबसाईट :- **www.acbmaharashra.gov.in**

Scanned by CamScanner